**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## कायद्याच्या विद्यार्थ्यांनी जागरूक राहून आव्हाने स्वीकारावी - कुलगुरू
## विद्यापीठात एकदिवसीय जागरूकता आणि संवादात्मक कार्यक्रमाचे उद्‌घाटन

अमरावती -

मानवाधिकार, सायबर स्पेस यांमध्ये आव्हानांसोबत संधी सुद्धा असून कायद्याच्या विद्यार्थ्यांनी जागरूक राहून ती स्वाकारावीत, असे मत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी व्यक्त केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या विधी विभागाच्यावतीने विद्यापीठ अनुदान आयोगाकडून प्राप्त झालेल्या निधीमधून 'मानवाधिकार सायबर स्पेस : आव्हाने व संधी' या विषयावर एकदिवसीय जागरूकता आणि संवादात्मक कार्यक्रमाचे आयोजन विद्यापीठ दृकश्राव्य सभागृहामध्ये करण्यात आले, त्याचे उद्‌घाटन करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून मानव विज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. स्मिता देशमुख, नागपूरचे सायबर कायदेशीर सल्लागार ॲड. महेंद्र लिमये, विधी विभागप्रमुख डॉ. विजयकुमार चौबे, डॉ. कल्पना जावळे उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर म्हणाले, विद्यार्थ्यांनी केवळ परीक्षा देण्यापुरते आणि उत्तीर्ण होण्यापुरते ज्ञान अवगत करून चालणार नाही, तर जीवन यशस्वी होण्यासाठी सर्वांगीण ज्ञान प्राप्त करण्याची गरज आहे. मानवी हक्क आणि सायबर सेल वेगळ्या बाबी असल्या तरी भारत सरकारने मेक इन इंडिया, डिजीटल इंडिया, स्टार्टअप यांसारख्यां अनेक योजना सुरू केल्या आहेत. नवनवीन तंत्रज्ञानाच्या बाबतीत आमचे विद्यार्थी अवगत होत आहेत; एवढेच नव्हे, तर भारताने तंत्रज्ञानामध्ये प्रचंड झेप घेतली आहे. विद्यार्थ्यांसमोर अनेक नवनवीन कल्पना आहेत आणि आपल्या कल्पना प्रत्यक्षात उतरविण्याची संधी सुद्धा आहे; पण त्यासाठी विद्यार्थ्यांनी सतत जागरूक असण्याची गरज आहे.

कुठलेही तंत्रज्ञान हे शिक्षण क्षेत्रातूनच येते. गुगल ज्ञानाचे भांडार आहे. आमचे विद्यार्थी गुगलच्या माध्यमातून विविध प्रकारचे ज्ञान मिळवितात. आज सर्वच क्षेत्राचे डिजीटलायझेशन होत आहे. त्या धरतीवर सायबर स्पेस हे नवीन जग आहे. वर्तमानातील विद्यार्थ्यांना नवनवीन तंत्रज्ञानाचे महत्व आणि माहिती असण्याची गरज असून या कार्यक्रमाच्या माध्यमातून आमचे विद्यार्थी ज्ञानी होवून त्याचा फायदा समाजाला देतील, असेही ते म्हणाले.

प्रमुख अतिथी डॉ. स्मिता देशमुख यांनी कार्यक्रमाचे उद्‌घाटन झाल्याची घोषणा केली व म्हणाल्या, मानवाधिकाराच्या बाबतीत प्रत्येकाने जागरूक असले पाहिजे. याशिवाय सायबर स्पेस सुद्धा महत्वाचे आहे. त्यामध्ये आव्हाने जरी असली तरी संधी सुद्धा आहे. कायद्याचे विद्यार्थी आजच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून अद्ययावत ज्ञान प्राप्त करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरूवात झाली. पाहुण्यांचे स्वागत करून विभागप्रमुख डॉ. विजयकुमार चौबे यांनी आभार मानलेत. पाहुण्यांचा परिचय डॉ. कल्पना जावळे यांनी करून दिला. संचालन नितीन साबरीक यांनी केले. कार्यक्रमाला विधी विषयाचे शिक्षक, डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, विनायक विधी महाविद्यालय व विद्यापीठाच्या विधी विभागाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. ०७/०३/२०१९.

दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी